8852

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जा.क्र.पोआअ/प्रली-आस्था/चापोभ- 2019/ /2021
पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे कार्यालय, कॅम्परोड
अमरावती, दूर क्र.0721-2551001,फॅक्स क्र.-2551010
ई मेल आयडी- cp.amravati@mahapolice.gov.in
**दिनांक :-** /०९/२०२१ 29 SEP 2021

---

# प्रेस नोट

**पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर** आस्थापनेवरील **चालक पोलीस शिपाई भरती २०१९ करीता ऑनलाईन आवेदन सादर केलेल्या परंतु अदयापही प्रोफाईलचे पासवर्ड अदयावत न केलेल्या उमेदवारांसाठी महत्वाची सुचना**

पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर आस्थापनेवरील रिक्त असलेल्या १९ चालक पोलीस शिपाई पदांकरीता चालक पोलीस शिपाई भरती-२०१९ अन्वये जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०५/०८/२०२१ रोजी दिलेल्या शुध्दीपत्रकानुसार सर्व उमेदवारांना त्यांचे प्रोफाईलचे युजर आयडी, पासवर्ड व संवर्ग बदलण्याबाबत स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवुन तसेच शासकिय संकेतस्थळावर माहिती प्रसारीत करुन अवगत करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त कार्यालयातर्फे पासवर्ड अदयावत न केलेल्या उमेदवारांना पासवर्ड अदयावत करण्याबाबत माहिती देण्याकरीता उमेदवारांचे ई मेल आयडीवर दि. २५/०८/२०२१, दि. ३०/०८/२०२१, दि. ०२/०९/२०२१ व दि. ११/०९/२०२१ रोजी उमेदवारांचे ई मेल आयडीवर ई मेल संदेश पाठवुन पासवर्ड अदयावत करण्याबाबत कळविण्यात आलेले आहेत. दि. २४/०९/२०२१ रोजी पासवर्ड अपडेट न केलेल्या उमेदवारांना SMS व्दारे पासवर्ड अपडेट न केल्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे तसेच उमेदवार ज्या जिल्हयाचे निवासी आहेत तेथील पोलीस घटकप्रमुखांना संबंधीत उमेदवारांचे पत्यानुसार माहिती देण्याकरीता लेखी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

असे निर्दशनास आले आहे की, उमेदवारांना उपरोक्त विविध माध्यमातुन माहिती देवुन सुध्दा अदयापही काही उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईलचे पासवर्ड अपडेट केलेले नाहीत. अश्या सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, सदर भरती प्रक्रिया संपुर्णपणे संगणकीकरण पध्दतीने करण्यात येत असल्याने ज्यांनी दिलेल्या निर्देशप्रमाणे पासवर्ड अपडेट करण्याची कार्यवाही केलेली नाही त्यांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) प्राप्त होणार नाहीत. ज्या उमेदवारांना पासवर्ड अपडेट करण्यास तांत्रीक अडचण निर्माण येत असेल त्यांनी हेल्पडेक्स क्रमांक **18002100309** तसेच ई मेल bhartimahapolice@gmail.com यावर संपर्क करावा. **पासवर्ड अपडेट न केल्यामुळे प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास त्याकरीता उमेदवार सर्वस्वी जबाबदार राहणार याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

प्रवेशपत्र प्राप्त झालेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक ०४/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. ते १२.३० वा. यावेळेत घेण्यात येणार आहे. उमेदवारांनी ओळखपत्रावर नमुद केलेल्या परिक्षा केंद्रावर दिनांक ०४/१०/२०२१ रोजी सकाळी ०९.०० वाजता उपस्थीत राहावे, १०.३० वाजता नंतर कोणत्याही उमेदवारांना परिक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. सदर परिक्षेकरीता उमेदवारांना त्यांचे प्रवेशपत्र (Hall ticket) दिनांक २८/०९/२०२१ पासुन त्यांच्या ईमेल आयडीवर व पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच सदरचे प्रवेशपत्र https://mhpolicebharti.cbtexam.in/ या वेबलिंक वरुन डाऊनलोड करता येतील.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

( विक्रम साळी )
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
अमरावती शहर

**प्रति,**
मा. संपादक,
दैनिक-------------------------------,अमरावती

२/- उपरोक्त माहिती जनहितार्थ असल्याने कृपया आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करावी. ही विनंती.

**प्रत-** पोलीस निरीक्षक- सायबर पोलीस ठाणे, अमरावती शहर

३/- उपरोक्त माहिती आयुक्तालयाच्या शासकिय संकेतस्थळ /फेसबुक/ इन्स्टाग्राम व इतर समाजमाध्यमावर प्रसिध्द करावी.